**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,**

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय, राजगुरूनगर

ता. खेड, जि. पुणे- 410 505

## अर्थशास्त्र विभाग

(शैक्षणिक वर्ष 2019 - 2020 पासून)

वर्ग:- प्रथम वर्ष कला शाखा (F.Y.B.A.) G-I

विषय:- (भारतीय आर्थिक पर्यावरण-I)

Indian Economic Environment-I

सेमिस्टर :- I

अर्थशास्त्र विभाग प्रमुख- डॉ. उमेश भोकसे

**प्रकरण दुसरे**

कृषी पर्यावरण

SBM ECO

**प्रस्तावना**:-

**प्रगत देशांच्या शेती विकासापूर्वीच भारतीय शेतीचा विकास एका उच्च पातळीला झालेला होता. तेव्हा शेती आणि उद्योग यांच्यामध्ये विकासाच्या बाबतीत समतोल निर्माण झालेला होता. दोन्हीही क्षेत्रांचा विकास समान गतीने आणि एकाच दिशेने होत होता. ही स्थिती 18 व्या शतकाच्या मध्यापर्यंत होती. इंग्रज सरकारच्या हस्तक्षेपामुळे आणि ग्रामोद्योगाच्या ऱ्हासाच्या जाणीवपूर्वक स्वीकारलेल्या धोरणामुळे कृषी आणि उद्योग क्षेत्रामध्ये विकासाच्या बाबतीत विसंवाद निर्माण झाला. ब्रिटिश सरकारने वसाहतवादाचे धोरण स्वीकारले आणि शेती विकासासाठी फारसे प्रयत्न केले नाहीत. याउलट जमीनदार हा मध्यमवर्ग**

**निर्माण करून त्याच्यामार्फत ग्रामीण भागातील गरीब लोकांचे शोषणच केले. या जमीनदारांनी कुळांकडून शेती उत्पादनातील एक मोठा भाग काढून घेतला आणि अल्पसा भाग कुळांना दिला. या उत्पादनात शेतकरी आपला उदरनिर्वाह व्यवस्थितपणे चालवू शकत नव्हते. त्यामुळे त्यांच्याकडून बचत होणे अशक्य होते. कुळांकडून शेतीमध्ये गुंतवणूक होऊ शकली नाही. त्यामुळे शेतीचा इंग्रजांच्या काळात फारसा विकास झाला नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विशेषतः हरितक्रांती नंतर सरकारकडून मोठ्या विकासाचे कार्यक्रम जाणीवपूर्वक राबविण्यात आले. त्याचप्रमाणे अनेक शेतकऱ्यांनी शेतीचे स्वरूप 'उदरनिर्वाहाची शेती' कडून 'व्यापारी शेती' असे केले.**

**भारतीय शेती क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील योगदान खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.**

1. **राष्ट्रीय उत्पन्नात महत्वपूर्ण वाटा** :- **भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीक्षेत्रास अनन्यसाधारण महत्त्व आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीस सन** 1950-51 **मध्ये राष्ट्राच्या एकूण उत्पन्नात शेती क्षेत्राचा वाटा** 56.5% **इतका होता. या पंचवार्षिक योजना काळात कृषी विकासाबरोबर कृषीआधारीत उद्योगव्यवसायामुळे देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला. मात्र** 1970-71 **मध्ये शेतीचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा** 45.5% **इतका राहिला. सन** 1990-1991 **मध्ये तो** 24.7 **टक्के इतका झाला. तर सन** 2010-11 **मध्ये भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा हा केवळ** 14.5 **टक्के**

SBM ECO

**होता. एकूण राष्ट्रीय उत्पन्नामध्ये शेती क्षेत्राचा प्रत्यक्ष वाटा बराच कमी झाला. सन** 2017-18 **मध्ये एकूण राष्ट्रीय उत्पन्नामध्ये शेती क्षेत्राचा वाटा** 14.6 **टक्के होता. दुसऱ्या बाजूला उद्योग व सेवा क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा मात्र वाढत चालला आहे असे दिसून येते.** 2018 **मध्ये एकूण राष्ट्रीय उत्पन्नात उद्योग क्षेत्राचा वाटा** 26.75 **टक्के, तर सेवा क्षेत्राचा वाटा** 49.13 **टक्के इतका असल्याचे दिसून येते. एकूण राष्ट्रीय उत्पन्नामध्ये कृषीक्षेत्राच्या वाट्यांमध्ये जरी घट होत असली तरी विविध प्रकारच्या उद्योग आणि सेवा व्यवसायामध्ये अप्रत्यक्षरीत्या शेतीक्षेत्राचे योगदान महत्त्वपूर्ण आहे, त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात शेतीक्षेत्राचा महत्त्वाचा वाटा आहे असे म्हणावे लागते.**

2. **औद्योगिकीकरणासाठी कच्च्या मालाचा पुरवठा :- भारतातील शेतीपासून प्रमुख उद्योगांना कच्च्या मालाचा मोठ्या प्रमाणावर पुरवठा होतो. देशातील कृषीक्षेत्राचा पुरेशा प्रमाणात विकास झाल्याशिवाय आधुनिक क्षेत्राचा विकास झपाट्याने होऊ शकत नाही. कृषीक्षेत्रातून, औद्योगिक क्षेत्राला कच्च्या मालाचा पुरवठा होत असतो. भारतातील कापड गिरण्या, ताग गिरण्या, साखरकारखाने, तेल गिरण्या, चहा कंपन्या, कॉफी उद्योग, रबर उद्योग, फळ प्रक्रिया उद्योग, बिस्किटे व इतर खाद्यपदार्थांचे उत्पादन करणारे उद्योग, शीतपेय यांसारख्या अनेक उद्योगांना कच्च्या मालाचा पुरवठा करण्याचे काम कृषिक्षेत्र करत असते. त्याचप्रमाणे कागदनिर्मिती उद्योग, मद्यार्कनिर्मिती, कातडी उद्योग, काडेपेटी उद्योग इत्यादी उद्योग कृषीक्षेत्रातील कच्च्या मालाच्या पुरवठ्यासाठी अवलंबून**

SBM ECO

असतात. इतर उद्योगांमध्ये लोहपोलाद उद्योग, अभियांत्रिकी उद्योग, यंत्रसामग्री तयार करणारे उद्योग व अनेक आधुनिक उद्योग कच्च्या मालाच्या पुरवठ्यासाठी जरी कृषी क्षेत्रावर अवलंबून नसले तरी या क्षेत्रातील उत्पादनांना मागणी निर्माण करण्याचे कार्य कृषीक्षेत्रमार्फत होते तसेच या उद्योगात काम करणाऱ्या कामगारांना अन्नधान्य पुरवठा करण्याचे काम कृषीक्षेत्रच करत असते. भारतामध्ये अनेक प्रकारच्या औद्योगिक क्षेत्राला कच्च्या मालाचा पुरवठा करण्याचे महत्त्वाचे काम कृषीक्षेत्र करत असल्याचे दिसते.

3. **रोजगारनिर्मिती** :- भारतात कृषीक्षेत्र हे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे बहुतांश लोकांच्या जीवननिर्वाहाचे साधन आहे. भारतातील एकूण कार्यकारी लोकसंख्येच्या 58.2 टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष- अप्रत्यक्षपणे कृषीक्षेत्रात कार्यरत आहे. याशिवाय अन्य बहुतांशी लोक कृषीवस्तूंचा व्यापार, वाहतूक इत्यादी क्षेत्रांमध्ये गुंतलेले आहे. शेतीव्यवसायातून भारतीय अर्थव्यवस्थेत सर्वाधिक रोजगार पुरविला जातो. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. सन 1950-51 मध्ये शेतीक्षेत्रातून 70 टक्क्यांपर्यंत रोजगार पुरविला जात होता. सन 2010-11 मध्ये हे प्रमाण 54.4 टक्के पर्यंत कमी झालेले आहे. तरीही निम्म्यापेक्षा अधिक रोजगाराची निर्मिती कृषीक्षेत्रामध्येच होत आहे. कारण स्वातंत्र्यानंतरच्या काळात बिगर-कृषीक्षेत्राची झालेली वाढ ही मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करण्यास उपयुक्त ठरली आहे. तरीही आजमितीस ग्रामीण भारतात एकूण

SBM ECO

**लोकसंख्येच्या** 72 **टक्के लोकसंख्या ही शेती व शेतीवर आधारित इतर व्यवसायावर अवलंबून आहे. भारताशेजारील देशांपैकी पाकिस्तानमध्ये** 57%, **इंडोनिशिया** 52% **इंग्लंडमध्ये** 2%, **इजिप्तमध्ये** 42%, **अमेरिकेमध्ये** 3%, **जपान मध्ये** 7% **तर ऑस्ट्रेलियामध्ये हेच प्रमाण** 6% **इतके आहे. भारतामध्ये औद्योगिक व सेवा क्षेत्राचा विकास अधिक प्रमाणात होत असला तरी रोजगाराच्या संधी मात्र तेवढ्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत नसल्यामुळे लोकांना रोजगारासाठी आजही मोठ्या प्रमाणात कृषी क्षेत्रावरच अवलंबून राहावे लागते.**

4. **उदरनिर्वाहाचे साधन** :- **भारतातील अनेक लोक आजही ही शेतीस उपजीविकेचे साधन मानतात. विशेषतः ज्या ठिकाणी कोरडवाहू शेती केली जाते हे त्या प्रदेशामध्ये शेती हे एक उदरनिर्वाहाचे साधन समजले जाते. भारतातील गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, ओडिशा, पश्चिम बंगाल या राज्यांमधील अल्पभूधारक शेतकरी आजही शेतीकडे उदरनिर्वाहाचे साधन म्हणून पाहतात. भारतातील एकूण जमिनीपैकी** 108 **दशलक्ष क्षेत्र म्हणजे एकूण शेतीक्षेत्रापैकी जवळजवळ** 75 % **क्षेत्र कोरडवाहू जमिनीचे आहे. कोरडवाहू जमिनीचे क्षेत्र असणाऱ्या प्रदेशातील लोक कुटुंबाची खाद्यान्नाची ची गरज भागविण्यासाठी शेती हा महत्त्वाचा स्रोत म्हणून शेतीकडे पाहतात. या प्रदेशात मान्सून वर आधारित शेती आणि सिंचनाचा अभाव आहे ते त्या प्रदेशातील शेतकरी शेतीमध्ये ज्वारी, बाजरी, तेलबिया, राई व कडधान्ये**

SBM ECO

**यांसारख्या खाद्य पिके घेतात. कुटुंबासाठी आवश्यक खाद्य पिकांचा वाटा वगळता बाकीच्या धान्याची बाजारात विक्री करून इतर गरजा भागविल्या जातात. अशा प्रकारे शेती हे भारतातील अनेक शेतकऱ्यांचे उदरनिर्वाहाचे साधन आहे.**

5. **खाद्यान्न पुरवठा:- भारताची लोकसंख्या ही जगातील दुसऱ्या क्रमांकाची लोकसंख्या आहे. त्यामुळे आपल्या देशाची अन्नधान्याची मागणीही मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. भारताचा विचार करता सन** 2004-05 **मध्ये देशांतर्गत अन्नधान्याची मागणी** 200.7 **दशलक्ष टन इतकी होती. ही मागणी अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी** 235.04 **दशलक्ष टनांपर्यंत वाढली आहे. भारताच्या अफाट लोकसंख्यावाढीमुळे सण** 2020 21 **पर्यंत अन्नधान्याची गरज** 280.6 **दशलक्ष टनांपर्यत वाढण्याची शक्यता आहे. भारताची वाढलेली अन्नधान्याची गरज पूर्ण करण्यासाठी अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात अन्नधान्य उत्पादन वाढीचा दर** 1.86 **ते** 2 **टक्क्यापर्यंत आवश्यकता आहे. परंतु फादर** 0.50 **पर्यंतचे हे उद्दिष्ट गाठू शकत नाहीत. त्यामुळे शेतीक्षेत्रात भरीव स्वरूपाचे संशोधन होऊन हरितक्रांती नंतर दुसऱ्या एका क्रांतीची आवश्यकता आहे. भारताच्या शेतीमध्ये योग्य प्रकारे नियोजन केल्यास आपल्या देशाची खाद्यान्नाची गरज भागवून इतर देशांनाही आपण खाण्याचे पदार्थ निर्यात करू शकतो एवढी क्षमता आपल्याकडे आहेत.**

SBM ECO

त्यामुळे खाद्यान्नाचा पुरवठा मुख्यत्वेकरून भारताला शेती व्यवसायातूनच होता. भारताचे खाद्यान्नाची गरज लक्षात घेऊन सन 2020 मध्ये आलेल्या कोरोना या आजाराच्या काळात देखील कोणत्याही प्रकारच्या मर्यादा घातल्या नव्हत्या.

या सर्व व्यवसायाच्या विकास करून कृषी क्षेत्राच्या विकासावर अवलंबून आहे. यामध्ये जनावरांसाठी चारा हा अत्यंत महत्त्वाचा असतो. कृषी क्षेत्रावर आधारित असते. पावसाचे प्रमाण घाटल्यास जनावरांसाठी चाऱ्याचा प्रश्न गंभीर होऊन . ग्रामीन भागातील शेतकरी वर्गाला उत्पन्नाचा एक महत्त्वाचा भाग होऊन पशुधन योजनेकडे पाहिले जाते. शेतकऱ्याकडे मुलीचे प्रमाण कमी आहे ते शेतकरी इतर पशुपालन व्यवसाय करून यातून उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न करत असतात. त्यासाठी लागणारे पशुखाद्य आणि चारा कृषी क्षेत्रातून मिळते असतो. शेतमालाच्या किमती वाढल्यानंतर पशुखाद्याच्या किमती देखील वाढतात व त्यांचा परिणाम होतो. त्यामुळे शेतीसाठी वरदान ठरलेले सर्व पूरक व्यवसाय दमून असतात त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये पशुपालन व त्यावर नेसर्गिक आधारित प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष

कृषी क्षेत्रावर अवलंबून असल्याचे दिसते.

6. **चाऱ्याचा पुरवठा आणि पशुधन विकास** – या सर्व व्यवसायाच्या विकास करून कृषी क्षेत्राच्या विकासावर अवलंबून आहे. यामध्ये जनावरांसाठी चारा हा अत्यंत महत्त्वाचा असतो. कृषी क्षेत्रावर आधारित असते. पावसाचे

SBM ECO

**प्रमाण घटल्यास जनावरांसाठी चाऱ्याचा प्रश्न गंभीर होऊन . ग्रामीन भागातील शेतकरी वर्गाला उत्पन्नाचा एक महत्त्वाचा भाग होऊन पशुधन योजनेकडे पाहिले जाते. शेतकऱ्याकडे शेतीचे प्रमाण कमी आहे ते शेतकरी इतर पशुपालन व्यवसाय करून यातून उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न करत असतात. त्यासाठी लागणारे पशुखाद्य आणि चारा कृषी क्षेत्रातून मिळते असतो. शेतमालाच्या किमती वाढल्यानंतर पशुखाद्याच्या किमती देखील वाढतात व त्यांचा परिणाम होतो. त्यामुळे शेतीसाठी वरदान ठरलेले सर्व पूरक व्यवसाय अवलंबून असतात. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये पशुपालन व त्यावर नेसर्गिक आधारित प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष कृषी क्षेत्रावर अवलंबून असल्याचे दिसते.**

भारतातील पशुधन **अनुमान** दशलक्षमध्ये

| वर्ष | गोधन | म्हैस | बकरी | शेळ्या | घोडे | उंट | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2010 | 127.3 | 88.88 | 4.66 | 9.03 | 0.75 | 0.49 | 231.1 |
| 2020 | 129.1 | 95.31 | 5.03 | 10.32 | 0.63 | 0.43 | 240.8 |
| 2030 | 133.6 | 106.8 | 5.76 | 11.18 | 0.29 | 0.29 | 257.9 |

स्त्रोत: भारत पशुपालन डेअरी विभाग आर्थिक सांख्यिकी अहवाल 2013

7. वाहतूक:- भारतामध्ये रस्ते आणि रेल्वे या वाहतुकीच्या मार्गाचा शेतीमाल वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणात उपयोग होतो. शेती उत्पादित कच्चामाल कारखान्यापर्यंत पोहोचविण्यासाठी वाहतुकीच्या सुविधांची आवश्यकता असते. तसेच दैनंदिन जीवनामध्ये आवश्यक असलेल्या खाद्यान्नाचा बाजारपेठेपर्यंत

SBM ECO

पुरवठा करण्यासाठी वाहतुकीची आवश्यकता असते. शेतीतून उत्पादित होणारा भाजीपाला, फळे, फुले, कडधान्य, धान्य, डाळी यासारख्या सर्व शेतमाल बाजारपेठेपर्यंत पोहोचविला जातो. त्यासाठी वाहतुकीच्या सुविधांची आवश्यकता असते. शेतमाल वाहतूक करण्यासाठी वाहतूक क्षेत्रांमध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष गुंतलेल्या सर्व लोकांना रोजगाराची प्राप्ती शेतमालामुळे होत असते. कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या कच्चा शेतमाल विविध वस्तूंच्या रूपाने बाजारपेठेपर्यंत व बाजारपेठ पासून ग्राहकांपर्यंत पोहोचविणे हेदेखील वाहतुकीवर अवलंबून असते त्यामुळे भारतातील वाहतूक क्षेत्रामध्ये कृषी मालाचा वाटा मोठा आहे.

8. अंतर्गत व्यापार:- भारतातील सुमारे 58% लोकसंख्या ही शेती आणि शेतीशी संबंधित इतर व्यवसायांवर अवलंबून आहे. भारतातील खाद्यन्न उद्योगांमध्ये प्रचंड भरभराट होत आहे. भारतातील इतर उद्योगांमध्ये अन्न व किराणा बाजार सहाव्या क्रमांकावर असून, किरकोळ विक्रीमध्ये खाद्यान्न मालाचा 70% वाटा आहे. भारतामध्ये अन्नप्रक्रिया उद्योगाचा बाजारात 32% वाटा आहे जो भारतातील सर्वात मोठ्या उद्योगांपैकी एक उद्योग आहे. त्याचप्रमाणे शेतीआधारित इतर व्यापाऱ्यांमध्ये ही भारतात अनेक क्षेत्रात संधी आहे. सन 2019-20 मधील अंतर्गत व्यापाराच्या आकडेवारीचा अभ्यास करता भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा फळ उत्पादक देश ठरला आहे. भारतातील शेतमाल प्रक्रिया उद्योगांमध्ये जवळजवळ 9. 41 अब्ज अमेरिकन डॉलरची आवक झालेली आहे. अनेक मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या भारतामध्ये एखाद्यान्ननिर्मिती प्रक्रिया उद्योगांमध्ये गुंतवणूक करत असल्याचे दिसते. उदा. कोका-कोला, नेस्टले इत्यादी अंतर्गत

SBM ECO

व्यापाराचा विचार करता शेती व शेतीशी संबंधित व्यवसायाशी निगडीत अनेक लोक भारतामध्ये अंतर्गत व्यापारामध्ये जोडलेले आहेत. शहरी भागात राहणाऱ्या लोकसंख्येच्या तुलनेत ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण हे सन 2011 च्या जनगणने नुसार 68% आहे. ग्रामीण भागातील लोकांच्या दैनंदिन गरजा, कापड, वाहतूक, दळणवळण, गृहपयोगी वस्तू, इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रॉनिक वस्तू, शेती कामासाठी लागणारे अवजारे, सिंचन साहित्य या सर्वांचे निर्मिती विविध प्रकारच्या उद्योगांमध्ये होत असते. ते सर्व उद्योग बाजारपेठेच्या अनुषंगाने भारतातील ग्रामीण भागावर अवलंबून असतात. त्यामुळे अंतर्गत व्यापारामध्ये ग्रामीण भागातील लोकांचा म्हणजेच पर्यायाने शेती क्षेत्राचा वाटा सर्वाधिक असल्याचे दिसते.

9. निर्यात:- भारतातील कृषी वस्तुंच्या निर्यातीत चहा, कॉफी, साखर, तंबाखू, मसाल्याचे पदार्थ, कापूस, बासमती तांदूळ, इतर तांदूळ, खाद्यतेल, ताज्या भाज्या प्रक्रिया केलेली फळे, दुग्ध उत्पादने, कोको उत्पादने, डाळी उत्पादने इतर तेलबिया उत्पादन यांचा वाटा महत्वाचा आहे. भारतामधून बासमती तांदूळ, मसाल्याचे पदार्थ, कापूस ह्या वस्तूंची सर्वात जास्त निर्यात होतात. भारत, अमेरिका, व्हिएतनाम, इराण, चीन अरब अमिराती, बांगलादेश, सौदी अरेबिया, मलेशिया, इंडोनेशिया, नेपाळ आणि इतर देशांना कृषी उत्पादन निर्यात करतो. सन 2018-19 मध्ये भारताने 38,739.10 दशलक्ष किमतीच्या शेतमाल इतर देशांना निर्यात केला. भारतामधून निर्यात होणाऱ्या व आद्योगिक व सेवा उत्पादनापैकी 9.04 % वाटा शेतमालाचा आहे. भारत, इंडोनेशिया, अर्जेंटिना,

SBM ECO

युकेन, यूएसए आणि ब्राझील या देशांकडून काही प्रमाणात खात्याने आयात करतो. परंतु निर्यातीपेक्षा आयात मालाचे मूल्य निम्म्याहून कमी आहे. देशातील खात्याची गरज भागवून मोठ्या प्रमाणात निर्यात करणारा भारत हा जगातील महत्त्वाचा देश आहे. मसाल्याचे पदार्थ निर्यात करण्यामध्ये भारताचा प्रथम क्रमांक लागतो.

10. बाजारपेठेची उपलब्धता:- उद्योगांमधून जो माल उत्पादित होतो त्या मालाला बाजारपेठ उपलब्ध होणे महत्त्वाचे असते. औद्योगिक उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध नसेल तर उत्पादित मालाच्या किमतीमध्ये घसरण होते. देशातील वाहननिर्मिती, कृषीसंबंधित उद्योग, सिमेंट, गृहपयोगी वस्तू, शिक्षण, आरोग्य सुविधा, औषधे, बांधकाम, सेवा, व्यवसाय, दूरसंचार, वस्त्रोद्योग, पर्यटन, खनिज उत्पादने, मौल्यवान धातू, बँकिंग, स्वयंचलित मोटारी ह्यांसारख्या उद्योगात उत्पादित होणाऱ्या सर्व वस्तू किंवा सेवा शहरी भागापुरतीच मर्यादित नसतात. या सर्व सेवांची आवश्यकता भारतातील ग्रामीण भागातही असते. जर कृषी क्षेत्रामध्ये चांगले वातावरण असेल तर शेतकऱ्याची वस्तू आणि सेवा खरेदी करण्याची क्षमता वाढते. भारतातील बहुतांशी समाज आजही खेड्यामध्ये राहत आहे. अलीकडील काळात लोकांच्या गरजा बदललेले आहेत. शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागात असणाऱ्या वाहन, शिक्षण, बँकिंग, बांधकाम या उद्योगांना चांगले दिवस आलेले आहेत. उदा. दुचाकी वाहन, चारचाकी वाहन, मोबाईल फोन, टीव्ही, फ्रीज यासारखे अनेक वस्तूंना ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबातील मोठ्या प्रमाणात मागणी आहे. त्यामुळे या उद्योगासंबंधी व्यवसायात तेजीचे वातावरण

SBM ECO

आहे. ग्रामीण भागातील तालुका पातळीवर अनेक बहुराष्ट्रीय कंपनी सेवा केंद्र विकसित झालेली आपण पाहतो. ज्या भागात जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध आहेत तेथे शेतकरी शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करुन चांगल्या प्रकारचे उत्पादन घेतात. या वर्गातील लोकांची क्रयशक्ती उत्तम असल्याने ग्रामीण भागातही सर्वच प्रकारच्या वस्तूंना मागणी वाढून बाजारपेठांचा विकास झालेला दिसून येतो.

**2.2 -** भारतीय शेती पुढील आव्हाने-

2.2.1- उत्पादकता -

शेतीची उत्पादकता म्हणजे दर हेक्टरी उत्पादनाचे प्रमाण होयशेतीच्या . उत्पादकतेच्या बाबतीत शेतीतील उत्पादन आणि शेत जमीन व श्रमिक शेतीची उत्पादकता पुढील प्रकारे .यांच्यातील संबंधांचा विचार केला जातो .मोजता येते

A. प्रति हेक्टरी उत्पादकता- यामध्ये एकूण उत्पादनाला शेतजमिनीच्या क्षेत्रफळाने भागले असता उत्पादन समजते.

प्रति हेक्टरी उत्पादकता (हेक्टर ) क्षेत्रफळ/ शेतीतील एकूण उत्पादन =

B. प्रति श्रमिक उत्पादकता- शेतजमिनीत होणाऱ्या उत्पादनाचे दर श्रमिका मागे पडणारे प्रमाण म्हणजे प्रति श्रमिक उत्पादकता होय. जमिनीतील उत्पादन व त्यासाठी वापरलेल्या एकूण श्रमिकांची संख्या यांचे गुणोत्तर म्हणजे प्रति श्रमिक उत्पादकता होय.

**भारतीय शेतीची उत्पादकता**भारतात हरित क्रांतीनंतर शेतीचे उत्पादनात - .मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते1970 71 मध्ये अन्नधान्याचे प्रति

हेक्टरी उत्पादन 872 किलोग्रॅम एवढे होते ते वाढून 2015-16 मध्ये 2042 किलोग्रॅम एवढे दिसून येतेतसेच विविध प्रकारच्या डाळी .,कडधान्य, तेलबिया ,ऊस, कापूस इत्यादी पिकांच्या बाबतीत प्रति हेक्टरी उत्पादन वाढत गेल्याचे दिसून येते.

| पिक | 1950 51 | 2000 2001 | 2016 17 |
|---|---|---|---|
| एकूण अन्नधान्य | 552 kg | 16 26 kg | 21 53 kg |
| तेलबिया | 481 kg | 810 kg | 12 25 kg |
| कापूस | 88 kg | 190 kg | 519 kg |

अर्थात प्रगत राष्ट्रांच्या तुलनेत भारतीय शेती क्षेत्रातील उत्पादकता कमी असल्याचे दिसून येते .2014 मध्ये भारतातील गव्हाची उत्पादकता चीनच्या फक्त 36 टक्के होती तर भारतातील तांदळाची उत्पादकता ब्राझीलच्या तांदूळ उत्पादकतेच्या तुलनेत केवळ एकूण 70 टक्के होतीकडधान्याच्या उत्पादकतेचा विचार . केल्यास भारताची कडधान्याची उत्पादकता चीनच्या तुलनेत फक्त38 टक्के होते तर कॅनडाच्या तुलनेत फक्त 32 टक्के होतीयावर .ून हे स्पष्ट होते की भारतीय शेतीची उत्पादकता इतर प्रगत राष्ट्र पेक्षा खूप कमी आहे.

**भारतीय शेतीची उत्पादकता कमी असण्याची कारणे -**

A. **सर्वसाधारण घटक-** भारतीय शेतीची उत्पादकता कमी असण्यास जबाबदार असलेले सर्वसाधारण घटक खालील प्रमाणे सांगता येतील.

1. लोकसंख्येची वाढ- भारतात शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण खूप जास्त आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे शेत जमिनीचे आकारमान कमी होऊन उत्पादकतेचे प्रमाण वाढू शकत नाही.

2. प्रतिकूल ग्रामीण वातावरण- ग्रामीण भागात रूढी-परंपरा अंधश्रद्धा अज्ञान दैववाद मोठ्या प्रमाणात असल्यामुळे शेतीच्या आधुनिकीकरणावर मर्यादा पडतात परिणामी उत्पादकतेचे प्रमाण वाढत नाही.

3. सुयोग्य विक्री व्यवस्थेचा अभाव- शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे. परंतु भारतातील शेतमाल विक्री व्यवस्थेत अनेक उणीवा आहेत. त्यामुळे शेतकऱ्याला आपल्या शेतमालास वाजवी भाव न मिळाल्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागते. व त्यामुळे उत्पन्न अभावी शेतकरी शेतात गुंतवणूक करू शकत नाही. परिणामी शेतीची उत्पादकता वाढू शकत नाही.

4. पुरेशा वित्तपुरवठ्याचा अभाव- भारतीय शेती क्षेत्राला पुरेशा प्रमाणात वित्तपुरवठा सहज व स्वस्त उपलब्ध होत नसल्यामुळे शेतीची उत्पादकता वाढत नाही.

5. नैसर्गिक आपत्ती- भारतीय शेतीची उत्पादकता कमी असण्याला नैसर्गिक आपत्ती हा घटक सुद्धा मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरतोवादळी वाऱ्यासह . अवेळी येणारा पाऊस, पूर् व इतर नैसर्गिक आपत्ती यामुळे शेती क्षेत्राचे नुकसान होतेया नैसर्गिक संकटामुळे शेती उत्पादनावर प्रतिकूल परिणाम . . होतो

SBM ECO

**B. संस्थात्मक घटक** -शेतीच्या उत्पादकतेला खालील संस्थात्मक घटक हेसुद्धा जबाबदार आहेत.

1. धारणक्षेत्राचा लहान आकार- भारतातील लागवडीखालील धारण क्षेत्राचा सरासरी आकार 2 हेक्टर पेक्षाही कमी आहेलहान धारण क्षेत्रामुळे शेतीत . नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे अशक्य असल्यामुळे उत्पादकतेचे प्रमाण कमी राहते.

2. जमीन धारणेची अयोग्य पद्धती- भारतात सध्या जमीनदारी पद्धती नसली तरी अनेक जमीनमालक इतरांना जमीन कसण्यासाठी देत आहेत, स्वतःची जमीन नसल्याने संबंधिताला अधिक उत्पादन करण्यास उत्साह असतो परिणामी शेतीची उत्पादकता वाढत नाही.

3. तंत्रज्ञान विषयक घटक- भारतीय शेतीच्या उत्पादकतेवर विपरीत परिणाम करणाऱ्या काही महत्त्वाचे घटक पुढीलप्रमाणे-

4. जुनाट उत्पादन तंत्राचा वापर- भारतीय शेतीत आजही जुनाट व कालबाह्य तंत्राचा वापर होत आहेभारतीय शेतकरी लागवडीच्या परंपरागत पद्धतीचा . .वापर करत आहेत यामुळे शेतीची उत्पादकता कमी राहते.

5. जलसिंचनाच्या अपुऱ्या सुविधा- भारतातील शेती पावसावर अवलंबून आहे . जलसिंचनाचे प्रकल्प कमी असल्याने साधारणपणे60 ते 65 टक्के जमिनीवर एकापेक्षा अधिक पिके घेता येत नाहीतओलिताखालील क्षेत्राचे प्रमाण कमी . असल्याने खतांचा वापर, सुधारित बियाण्यांचा वापर यावर मर्यादा पडून शेतीची उत्पादकता कमी राहते.

SBM ECO

6. सुधारित बियाण्यांचा मर्यादित वापर- दर्जेदार बियाणे खरेदी करणे आर्थिक अडचणीमुळे शेतकऱ्यांना शक्य होत नाही तसेच त्यांचा पुरवठा ही मर्यादित असतो त्यामुळे शेतकऱ्यांना पारंपारिक बियाण्यांचा वापर करावा लागतो . .सहाजिकच त्याचा उत्पादकतेवर वाईट परिणाम होतो

7. खतांचा मर्यादित वापर- भारतातील शेतकरी पुरेशा प्रमाणात खताचा वापर करू शकत नाहीरासायनिक खते तसेच सेंद्रिय खते यांचा पुरेशा प्रमाणात . .वापर न झाल्यामुळे शेतीची उत्पादकता कमी आहे

8. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा- भारतीय शेतकरी सावकाराकडून अधिक व्याजाने कर्ज घेतोयामुळे शेती .त्यामुळे तो सावकाराच्या जाळ्यामध्ये सापडतो . .उत्पादनात वाढ करण्यासाठी शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची प्रेरणा पुरत नाही

9. लागवडीची अशास्त्रीय पद्धत- भारतातील शेतकरी आजही ही पारंपारिक पद्धतीने आपली जमीन लागवडीखाली आणतोशेतकऱ्यांना आधुनिक . पेरण्यासाठी लाकडापासून तयार केलेल्या .तंत्रज्ञानाचे महत्व समजले नाही पारंपारिक अवजारांचा वापर केला जातो तसेच कमी दर्जाच्या बियाण्यांचा वापर केला जात असल्याने पिकांचा दर्जा ह ा सुद्धा निकृष्ट दर्जाचा असतो.

10. शेती संशोधनाच्या बाबतीत उणिवा- शेती उत्पादनात वाढ होण्यासाठी संशोधन होणे गरजेचे आहेभारतात शेती संशोधनावर कमी प्रमाणात खर्च केला . जातो तसेच कृषी विद्यापीठात व अन्य संशोधन संस्था संशोधनाची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवत नाही.

SBM ECO

11. योग्य शासकीय धोरणाचा अभाव- शेती विकासासाठी योग्य शासकीय धोरण अत्यावश्यक असतेभारतात शेतीविषयक धोरणात धरसोड वृत्ती अधिक दिसून . योग्य शेतमाल किंमत विषयक धोरणांचा अभाव .येते, शेतीविषयक सुधारणांच्या अंमलबजावणीतील उणिवा यामुळे शेती उत्पादकतेवर वाईट परिणाम होतो.

**शेती उत्पादकतेच्या बाबतीतील आव्हाने -**

शेतीची उत्पादकता वाढविण्याचे बाबतीत पुढील आव्हाने दिसून येतात-

1. जलसिंचन सुविधा- शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी जलसिंचन सुविधा वाढवणे गरजेचे आहे. जलसिंचनासाठी लघु मध्यम व मोठे जलसिंचन प्रकल्प पूर्ण करणे तसेच नवीन प्रकल्प हाती घेण्याची गरज आहे.
2. उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर- उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे हे सुद्धा गरजेचे आहे. त्यासाठी ठिबक सिंचन तुषार सिंचन यांचा वापर करून कमी पाण्यात अधिक क्षेत्र ओलिताखाली आणण्याचा प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.
3. कोरडवाहू शेती- पावसावर अवलंबून असलेल्या कोरडवाहू शेतीला पाणी उपलब्ध करून देणे याला प्राथमिकता दिली पाहिजे. तसेच कोरडवाहू शेतीसाठी उपयुक्त असे उत्पादन तंत्र निर्माण करणे अत्यावश्यक आहे.
4. संशोधन आणि विकास- बी-बियाणे खते कीटकनाशके शेतीसाठी आवश्यक असणारी अवजारे व यंत्रे इत्यादींच्या बाबतीत सातत्याने संशोधन

SBM ECO

करण्याचे तसेच हे संशोधन लोकांपर्यंत पोहोचवण्याचे मोठे आव्हान देशापुढे आहे.

5. शेतमाल विक्री व्यवस्थेत सुधारणा- देशातील कृषी बाजारात अनेक उणीवा दिसून येतात. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य किंमत मिळण्यासाठी विक्री व्यवस्थेतील उणिवा दूर करून उत्पादनवाढीला प्रेरणा देण्याचे मोठे आव्हान आज देशासमोर आहे.

6. शेतीवरील लोकसंख्येचा भार- भारतातील शेतीवर लोकसंख्येचा अतिरिक्त भार पडल्यामुळे शेतीची उत्पादकता कमी आहे. ग्रामीण भागात औद्योगिक व सेवा क्षेत्राचा विकास घडवून आणला तर नक्कीच शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी होईल.

### 2.2.2 ग्रामीण पतपुरवठा

पतपुरवठ्याची किंवा वित्त पुढे येण्याची आवश्यकता ही साधारणपणे उत्पादन प्रक्रियेशी जोडली जातेशेतीत सुधारणा करण्यासाठी विहीर खोदण्यासाठी खते . बियाणे खरेदी करण्यासाठी अशा उत्पादन कार्यासाठी शेतकऱ्यांना कर्ज -बी पुरवठ्याची गरज भासते तसेच अनुत्पादक कारणांसाठीजसे सणउत्सव विवाह - .समारंभ कर्ज पुरवठ्याची गरज शेतकऱ्यांना भासते

**ग्रामीण पतपुरवठा अथवा कृषी वित्त पुरवठ्याचे किंवा शेती कर्ज पुरवठ्याचे मार्ग -**

कृषी कर्ज पुरवठा स्त्रोत अथवा मार्ग पुढील प्रमाणे सांगता येतील-

**बिगर संस्थात्मक स्त्रोत-** यामध्ये सावकार, व्यापारी अडते दलाल , नातेवाईक, जमीनदार आणि इतरांचा समावेश होतोप्रामुख्याने सावकार हा . .सर्वात महत्त्वाचा स्त्रोत दिसून येतो1951 52 मध्ये कृषी पतपुरवठा एकट्या सावकाराचा वाटा 69.7% एवढा होता नंतरच्या काळात सावकाराचा हिस्सा कमी होत गेलापरंतु आजही कृष .ी कर्ज पुरवठ्यात सावकाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात दिसून येते .2015 सली एकूण कृषी कर्ज पुरवठ्यात बिगर संस्थात्मक मार्गातून प्राप्त झालेल्या कर्जाचे प्रमाण 28% एवढे होतेयावरून ग्रामीण भागात . .सावकाराचे वर्चस्व दिसून येते

**बिगर संस्थात्मक स्त्रोतांकडून होणाऱ्या कर्जपुरवठा च्या बाबतीत पुढील उणिवा दिसून येतात-**

1.व्याजदर अधिक- बिगर संस्थात्मक स्त्रोतांकडून केल्या जाणाऱ्या कर्ज पुरवठ्यावर खूप मोठ्या प्रमाणावर व्याज आकारले जातेत्यामुळे शेतकऱ्यांचे . .नुकसान होते

2.दीर्घकाळासाठी कर्जपुरवठा नाही- या स्त्रोतांकडून अल्पकालीन स्वरूपाचा कर्जपुरवठा केला जातो.ते दीर्घकालीन कर्जपुरवठा फारसा करतच नाही .

3.शेतकऱ्यांची फसवणूक- गरीब व अशिक्षित शेतकऱ्यांची सावकार मोठ्याप्रमाणावर फसवणूक करत असतो .

4.अनुत्पादक कारणासाठी वापरयांच्याकडून केलेला कर्जाचा पुरवठा हा - प्रामुख्याने अनुत्पादक कारणांसाठी अधिक असतो .

SBM ECO

5.अल्पभूधारकांच्या बाबतीत अडचणी- अल्पभूधारक शेतकरी यांना बिगर संस्थात्मक स्त्रोतांकडून कर्ज घेण्यात अडचणी येतातअल्पभूधारक . शेतकऱ्यांकडे तारण ठेवण्यासारखे काहीही नसल्यामुळे त्यांना कर्ज मिळत .नाही

2. **संस्थात्मक स्त्रोत**यामध्ये सरकार व्यापारी बँका सहकारी संस्था यांचा - .समावेश होतो

1. सरकार- भारतात केंद्र व राज्य सरकार मार्फत शेती क्षेत्राला प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे कर्ज पुरवठा केला जातो प्रामुख्याने दुष्काळ पूर यासारख्या आपत्तीच्या वेळी अशा प्रकारची कर्जे दिली जातसध्या शासन शेतकऱ्याला . .करते

2. सहकारी संस्था- सहकारी संस्थांकडून शेती क्षेत्राला कर्जपुरवठा होत आहे . सहकारी संस्थांमध्ये प्रामुख्याने प्राथमिक सहकारी पतसंस्था आणि भूवि‍कास बँका यांची भूमिका महत्त्वाची आहेप्राथमिक सहकारी पतसंस्था शेती क्षेत्राला . तसेच सहकारी शेती .अल्पकालीन व मध्यकालीन स्वरुपाचा वित्तपुरवठा करतात ही शेतकऱ्यांना दीर्घ मुदतीची (भूविकास बँक )आणि ग्रामीण विकास बँक .कर्जे उपलब्ध करून देण्याचे कार्य करतेशेती विकासाच्या बाबतीत या बँकेने महत्त्वाची भूमिका बजावली आहेलघु सिंचनासाठी या बँकेने मोठ्या प्रमाणावर . .खर्च उपलब्ध करून दिले आहेत

SBM ECO

3. व्यापारी बँका -14 बँकांचे राष्ट्रीयीकरण यानंतर शेती क्षेत्राला मोठ्या प्रमाणावर कर्जपुरवठा उपलब्ध होत आहे .1950 51 मध्ये एकूण कृषी कर्ज पुरवठ्यात व्यापारी बँकांचा वाटा केवळ 0.9% एवढा होता त्यात वाढ होऊन 1981 मध्ये तो 29.4% एवढा झाला .

4. प्रादेशिक ग्रामीण बँका -1975 पासून प्रादेशिक ग्रामीण बँका स्थापन करण्यास सुरुवात झालीया बँका अल्प मुदतीची कर्जे ., शेती कार्यासाठी दीर्घ मुदतीची कर्ज, ग्रामीण कारागीर, ग्राम उद्योग कुटिर उद्योग, किरकोळ व्यापारी , स्वयंरोजगार इत्यादी कारणांसाठी कर्जे देत आहे.

1951मध्ये एकूण कृषी वित्त पुरवठा यात संस्थात्मक कृषी वित्त पुरवठा चे प्रमाण 10 टक्के होते 1981 मध्ये 63 टक्के वाढले, 2015 मध्ये हे प्रमाण 72 टक्के पर्यंत वाढले.

**कृषी पतपुरवठा संबंधित आव्हाने -**

1. कर्जा संदर्भातील सुलभ पद्धती- संस्थात्मक मार्गातून कर्ज मिळण्याच्या बाबतीत शेतकऱ्यांना अनेक किचकट व गुंतागुंतीच्या पद्धतीला सामोरे जावे लागते. कृषी कर्ज मिळण्यासाठी अनेक औपचारिकता त्यांना पूर्ण करणे गरजेचे असते. त्यामुळे शेतकऱ्यांना कर्ज मिळण्यास विलंब होतो. परिणामी ते सावकाराकडून कर्ज घेणे पसंत करतात. त्यामुळे कर्ज मिळणे सुलभ करणे हेच मोठे आव्हान आहे.

2. वेळ आणि श्रम याचा अपव्यय- बहुतेक व्यापारी बँका आणि सहकारी बँका शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी तत्पर नसतात. शेतकऱ्यांना कर्ज

SBM ECO

मिळण्यासाठी बऱ्याच वेळेला शहरातील बँकांना भेटी द्याव्या लागतात. त्यामुळे ग्रामीण भागातच बँकांचे जाळे वाढविणे गरजेचे आहे.

3. सहकारी बँका आणि व्यापारी बँका यांच्यात समन्वय- सहकारी बँका व व्यापारी बँका यांच्यात पतनियोजनाच्या संदर्भात समन्वय दिसून येत नाही. त्यामुळे काही भागाला जास्त कर्जपुरवठा तर काही भागाला कमी कर्जपुरवठा अशी स्थिती आढळते. या दोन्ही बँकांच्या पतन योजनाच्या संदर्भात समन्वय साधला जाईल अशी व्यवस्था निर्माण करणे हे सुद्धा एक आव्हान आहे.

4. कर्जाचा उत्पादक वापर- बरच वेळेला उत्पादक कारणांसाठी घेतलेल्या कर्जाचा वापर शेतकरी अनुत्पादक कारणांसाठी करतो. त्यामुळे अशा कर्जाची परतफेड क्षमता कमी असल्यामुळे शेतकरी वेळेवर कर्जाची परतफेड करू शकत नाही. त्यामुळे ेतकऱ्यांकडून कर्जाचा वापर उत्पादक कारणा साठी होईल हे पाहण्यासाठी यंत्रणा उभी करण्याचे आव्हान आहे.

5. कार्यक्षम प्रशासन- व्यापारी बँका तसेच सहकारी बँकांचे व्यवस्थापन कार्यक्षम व्यक्तींकडे असले पाहिजे. परंतु अनेक बँकांच्या प्रशासनात अकार्यक्षम अधिकाऱ्यांचा भरणा दिसून येतो. त्यामुळे या बँकांच्या कार्यात उणिवा दिसून येतात. बँकांच्या प्रशासनात कार्यक्षमता वाढवण्यासाठी प्रयत्न करणे हे सुद्धा एक आव्हान आहे.

6. प्रादेशिक असमतोल- कृषी कर्ज पुरवठ्याच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर प्रादेशिक असमतोल दिसून येतो. गुजरात महाराष्ट्र-आंध्रप्रदेश पंजाब तामिळनाडू

SBM ECO

या राज्यांचा एकूण कृषी पत पुरवठ्यातील वाटा 52% एवढा आहे. यावरून प्रादेशिक असमतोल स्पष्ट दिसून येतो.

7. थकबाकी- शेतकऱ्यांकडून होणाऱ्या कर्जफेडीची चे प्रमाण अल्प असल्याने थकबाकीचे प्रमाण वाढत आहे. अनुत्पादक कारणांसाठी कर्जाचा वापर केल्याने शेतकऱ्यांना कर्जफेड करणे शक्य होत नाही. तसेच कर्जात सुट मिळेल या मानसिकतेत शेतकरी असल्याने कर्जाची परतफेड वेळेवर होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचा कर्ज पुरवठा करण्याच्या बाबतीत बँका उदासीन राहतात.

8. उपभोग कर्ज- शेतकऱ्यांना कुटुंबाच्या उपभोगासाठी सुद्धा कर्जाची गरज असते. शेतकऱ्यांना बँकांकडून उपभोग कर्ज दिले जात नसल्याने ते ते सावकारांवर अवलंबून राहतात. त्यामुळे शेतकऱ्यांना उपभोगासाठी सुद्धा कर्ज उपलब्ध करून देण्याचे एक मोठे आव्हान आहे.

9. खाजगी संस्थांचे वर्चस्व- भारतात आजही ही खाजगी संस्थांकडून शेती क्षेत्राला मोठ्या प्रमाणावर कर्ज पुरवठा होत आहे. अर्थात यामध्ये हे मोठ्या प्रमाणावर विभा दिसून येतात. त्यासाठी संस्थात्मक स्त्रोतांकडून होणाऱ्या कर्ज पुरवठ्यात आणखीन वाढ होणे अत्यावश्यक आहे.

SBM ECO

### 2.2.3 विक्री व्यवस्था-कृषी बाजार /विपणन व्यवस्था /

विक्री व्यवस्था किंवा विपणन किंवा बाजार ही एक अशी प्रक्रिया आहे की ज्याद्वारे उत्पादक शेतकरी व ग्राहक यांना एकत्र आणले जातेशेतमाल विक्री .

व्यवस्थेत द्वारे शेतमालाचे उत्पादक व शेतमालाचे ग्राहक यांना एकत्र आणले जाते

भारतातील शेतमाल विक्री व्यवस्था-

भारतातील शेतकरी विविध पद्धतीने आपल्या शेतमालाची विक्री करतोशेतकरी . शेतकरी आपला .आपला महाल गावातच सावकार किंवा व्यापाऱ्याला विकतो तसेच जवळपासच्या मोठ्या गावातील .शेतमाल आठवडे बाजारात विकतो अर्थात शेतकऱ्यांना आपला शेतमाल .बाजारात आपला शेतमाल विकतो बाजारात नेण्यासाठी व्यवस्था करावी लागतेबाजारातील शेतमालाची विक्री . .दलाल किंवा मध्यस्थांमार्फत होते

**भारतातील शेतमाल विक्री व्यवस्थेच्या बाबतीत पुढील आव्हाने दिसून येतात-**

1. साठवणूक सोय- भारतातील शेतमाल विक्री व्यवस्थेच्या बाबतीत सर्वात महत्त्वाची समस्या म्हणजे शेतमालाची शास्त्रशुद्धपणे साठवणूक करण्याची सोय उपलब्ध नाही. त्यामुळे शेतमालाची नासाडी होते. शेतकऱ्यांना आपला माल बाजारात विकावा लागतो. परिणामी शेतमालाची आवक वाढून शेतकऱ्यांना कमी भाव स्वीकारावा लागतो.

2. प्रमाणीकरण आणि प्रतवारी- विविध प्रकारच्या शेतमालाची प्रतवारी करण्याऐवजी चांगल्या व वाईट मालाची भेसळ केली जाते. त्यामुळे शेतमालाला योग्य भाव मिळत नाही.

SBM ECO

3. वाहतूक सोय: भारतात आजही अनेक खेड्यांना शहरांना जोडणारी पक्के रस्ते नाहीत. शेतकऱ्यांना स्थानिक बाजारातच विकावा लागतो परिणामी त्यांना योग्य भाव मिळत नाही. वाहतूक सुविधेत वाढ करून शेतकऱ्यांना ज्या ठिकाणी शेतमालाला अधिक भाव मिळेल त्या ठिकाणी शेतमाल विकण्याबाबत ची सुविधा निर्माण करण्याचे मोठे आव्हान आहे.

4. प्रतीक्षा क्षमतेत वाढ- आर्थिक अडचणीमुळे शेतकरी आपल्या शेतमालाला योग्य किंमत मिळेपर्यंत प्रतीक्षा करू शकत नाही. त्यामुळे सर्व शेतकरी एकाच वेळी आपला शेतमाल विक्रीसाठी बाजारात आणतात परिणामी कमी किमतीला त्यांना आपला शेतमाल विकावा लागतो. शेतकऱ्यांची प्रत्यक्ष क्षमता वाढवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

5. बाजार विषयक माहिती- वेगवेगळ्या ठिकाणी शेतमालाच्या किमती काय आहेत याविषयी शेतकऱ्यांना माहिती नसते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा व्यापारी घेतात. सध्या शेतमालाच्या किमती संदर्भात मोबाईलच्या माध्यमातून माहिती पोहोचवणे शक्य आहे. त्यादृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे.

6. मध्यस्थांची साखळी- शेतमाल विक्री व्यवस्थेत दलाल, अडते,व्यापारी अशा मध्यस्थांची मोठी साखळी दिसून येते. त्यामुळे अंतिम ग्राहकाने शेतमालावर खर्च केलेल्या रकमेपैकी फार कमी रक्कम प्रत्यक्षात शेतकऱ्यांना मिळते. मध्यस्थांची साखळी कमी करण्यासाठी शेतकरी आपला शेतमाल प्रत्यक्ष ग्राहकांना व्यक्तीला अशी व्यवस्था निर्माण झाली तर शेतकऱ्या बरोबर ग्राहकांना सुद्धा लाभ होईल. अशी व्यवस्था निर्माण करणे हे मोठे आव्हान आहे.

SBM ECO

7. विविध प्रकारचे आकार- शेतकऱ्यांनी आपला शेतमाल कृषी बाजारात विकल्यानंतर त्यांना अनेक प्रकारचे आकार द्यावे लागतात जसे हमाली, तोलाई, धर्मादाय निधी इत्यादी. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाला कमी किंमत मिळाली तरी त्यातून हे आकार द्यावेच लागते म्हणून शेतकऱ्यांचे होणारे हे नुकसान टाळण्याची नितांत गरज आहे.

8. गैरप्रकार- कृषी बाजारात दलाल हे शेतकरी आणि व्यापारी यांच्यामधील मध्यस्थ म्हणून काम करतात. त्याच बरोबर दलाल व व्यापारी हे संगनमताने शेतकऱ्यांची फसवणूक करतात. म्हणजेच शेतकऱ्यांचा शेतमाल कमी किमतीला खरेदी करतात. दलाल आणि व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या या फसवणुकीला आळा घालने हे एक मोठे आव्हान आहे.

अशाप्रकारे भारतीय कृषी विपणन व्यवस्थेत अनेक प्रकारच्या उणिवा असल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला योग्य किंमत मिळत नाहीकृषी . विपणन व्यवस्थेतील दोष दूर करण्यासाठी विक्री व्यवस्थेत सुधारणा करणे .अत्यावश्यक आहे

SBM ECO

**2.3.4 ग्रामीण उद्योजकता**

ग्रामीण भागाचा व शेती क्षेत्राचा विकास होण्यासाठी ग्रामीण उद्योजकतेचा विकास होणे अत्यावश्यक आहेग्रामीण भागात असलेले व्यवसाय .,उद्योग, शेती इत्यादी व्यवहारांना चालना देण्याची आणि देशातील आर्थिक विकासात योगदान देण्याची भरपूर क्षमता असणाऱ्यांना ग्रामीण उद्योजकता म्हणता येईल.

थोडक्यात ग्रामीण उद्योजकता म्हणजे ग्रामीण औद्योगीकरण होयग्रामीण . भागातील उद्योग आणि व्यावसायिकाची स्थापन करणे म्हणजे ग्रामीण ग्रामीण उद्योजक म्हणजे ग्रामीण भागातील उदयोन्मुख .उद्योजकता होय .उद्योजकता होय

ग्रामीण भागातील बेकारीची समस्या दूर करण्यासाठी ग्रामीण भागात उद्योजकतेचा विकास होणे आवश्यक आहेग्रामीण भागात उद्योजकतेच्या . आणि .विकासाबरोबर रोजगार व स्वयंरोजगार विकास होण्यास मदत होते भारतात उत्पन्न आणि संप .त्यातून रोजगाराच्या संधी वाढून बेकारी कमी होतेत्ती च्या वाटणी मध्ये विषमता मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेग्रामीण भागात . ग्रामीण भागात उद्योजकतेचा विकास झाल्यास .सुद्धा विषमता खूप दिसून येते उत्पन्नाच्या संधी अधिक लोकांना मिळून विषमतेचे प्रमाण कमी होण्यास मदत .होईल

## ग्रामीण उद्योजक त्याच्या बाबतीतील आव्हाने-

1. कौटुंबिक आव्हाने- नोकरीऐवजी व्यवसायाची निवड करणार हे पटवून देणे कुटुंबातील सदस्यांना शक्य वाटत नाही. त्यामुळे कुटुंबातील ज्येष्ठ सदस्यांना विश्वासात घेऊन उद्योग-व्यवसायात यशस्वी होऊन दाखवणे हे मोठे आव्हान कुटुंबातील त्या व्यक्तीसमोर असते.

2. सामाजिक आव्हाने- भारतात आजही नोकरी करणाऱ्या व्यक्तींना व्यवसाय करणाऱ्या पेक्षा अधिक प्रतिष्ठा मिळत आहे. प्रामुख्याने कायमस्वरुपी नोकरी करणाऱ्याला बँकांकडून सहज कर्ज उपलब्ध होतात व त्यामुळे ते घर गाडी

SBM ECO

खरेदी करतात. या अर्थाने नोकरी करणारे लोक व्यवसाय करणाऱ्या पेक्षा कमी काळात यशस्वी होतात.

3. तंत्रज्ञान विषयक आव्हाने- भारतीय उद्योग क्षेत्रात तंत्रज्ञान फारसे विकसित झालेले नाही. तसेच उद्योजकांना कोणते तंत्रज्ञान आदर्श आहे आणि ते तंत्रज्ञान प्रभावीपणे कसे वापरावे हे ठरवण्याच्या बाबतीत समस्या निर्माण होते.

4. वित्तीय आव्हाने- उद्योग व्यवसाय सुरू करताना भांडवलाची गरज असते. ग्रामीण उद्योजकांकडे पुरेशा प्रमाणात भांडवल नसल्यामुळे वित्तीय साधनसामग्री उभी करण्याचे त्यांच्या समोर एक मोठे आव्हान असते. बँका आणि वित्त संस्थांकडून कमी व्याजदराने पुरेशा प्रमाणात कर्ज मिळण्यात ग्रामीण उद्योजकांना अनेक अडचणी येतात.

5. धोरणविषयक आव्हाने- सरकारच्या धोरणात मोठ्या प्रमाणात बदल होत असतात. तसेच कच्च्या मालाच्या उपलब्धतेचा प्रश्न, स्वदेशी तंत्रज्ञानाच्या संदर्भातील प्रश्न, वाढते प्रदूषण, पर्यावरण असमतोल अशा अनेक समस्या त्यांच्यासमोर निर्माण झालेल्या आहेत.

अशाप्रकारे ग्रामीण उद्योजक त्यांच्यासमोर काही प्रश्न आणि आव्हाने निर्माण झाली असली तरी ग्रामीण उद्योजकतेचा विकास होणे अत्यावश्यक आहे कारण ग्रामीण उद्योजक ते मुळे शेती क्षेत्र ग्रामीण भाग आणि पर्यायाने देशाचा आर्थिक विकास होतो .

**ग्रामीण उद्योजकता विकास होण्यासाठी पुढील उपाययोजना करणे आवश्यक वाटते-**

SBM ECO

ग्रामीण उद्योजकतेचा विकास होण्यासाठी योग्य पर्यावरण निर्माण करणे.

ग्रामीण उद्योजकांना योग्य कौशल्य उपलब्ध करून देणे.

ग्रामीण उद्योजकांना सवलतीच्या दराने सुलभ पद्धतीने कर्जपुरवठा उपलब्ध करून देणे. ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचा विकास करणे जसे वीज पुरवठा पाणीपुरवठा दळणवळण इत्यादी.

केंद्र सरकार आणि राज्य सरकारांनी सुद्धा ग्रामीण उद्योजकतेच्या वाढीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध प्रकारच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करणे .

संदर्भ:-

भारतीय आर्थिक पर्यावरण (२०१८) - प्राचार्य डॉ. एस. आर. जावळे, डॉ. एस. आर. पगार, डॉ. एस. आर. जावळे, डॉ. एस. व्ही. टिळे

भारतीय आर्थिक पर्यावरण (२००८) - प्रा. अलका झीमरे

https://www.wikipedia.org/

SBM ECO